जा.क्र./न.प.वाना./बां.वि./ २७२/२०१७
कार्यालय नगर परिषद वानाडोंगरी,जिल्हा नागपूर.
दिनांक :– ०९/०५/२०१७

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ व
महाराष्ट्र नगर पालिका, नगर पंचायती व औद्यागीक वसाहती अधिनियम १९६५ चे कलम १८९ अन्वये

**इमारत बांधकाम अंतीम मंजुरी आदेश**

युनिक कोड क्रं. –

| वर्ष कोड | | | | जिल्हा कोड | | तालुका कोड | | | निर्धारण अधिकारी कोड | | निर्धारण अधिकाऱ्याने दिलेला प्रकरण क्रं(जा.क्रं.) | | | | बांधकामाचा टप्पा | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | | | | | | | | |

प्रती,
मे. एल. जी. डेव्हलपर्स एण्ड बिल्डर्स,
तर्फे धनराज गणपतराव बाबडे,
रा. नागपूर.

विषय :–निवासी सदनिका बांधकामाचे सुधारीत आराखड्यास परवानगीबाबत

संदर्भ :– १) आपला अर्ज क्र. ५६ दिनांक १८/११/२०१६
२) एन.आय.टी. नागपूर यांची ईमारत बांधकाम परवानगी क. BE(Metro)/B.P. / 948, Dt. 0 2/11/2016
३) मा. सहसंचालक,नगर रचना, नागपूर विभाग,नागपूर यांचे पत्र क. न.प. वानाडोंगरी/सहसंचानाग/183, दिनांक 14/02/2017
४) या कार्यालयाचे बांधकाम मंजुरी आदेश क्र १३६दिनांक २२/०३/२०१७

वरील विषयाचे अनुषंगाने आपल्या अर्जानुसार वानाडोंगरी नगर परिषद क्षेत्रातील प.ह.नं. ४६, खसरा क. ३०८ बी, वरील लेआऊटचे एकत्रीकरण केलेले प्लॉट क. १ते १२ वरील निवासी सदनिका बांधकाम करण्यांस सुधारीत आराखड्यास परवानगी मिळण्याकरिता सादर केल्याप्रमाणे प्लॉटचे एकुण क्षेत्रफळ १४०५.८४ चौ.मि. वर खालील प्रमाणे क्षेत्रफळाचे सोबतचे मंजुर नकाशाप्रमाणे निवासी इमारत बांधकामास खालील अटी व शर्तीला अधिन राहुन अंतीम परवानगी देण्यात येत आहे.

| अ.क्र. | प्लॉटचे क्षेत्रफळची. मिटर | प्रस्तावित बांधकाम क्षेत्र चौ.मिटर | | प्रस्तावित फ्री टेरसचे क्षेत्र चौ.मिटर |
|---|---|---|---|---|
| १ | १४०५.८४ चौ.मीटर | तळ मजला | १८.४०१ | ० |
| २ | | पहिला मजला | ४१०.५९१ + ६.२७२= ४१६.८६३ | ० |
| ३ | | दुसरा मजला | ४१०.५९१ + ६.२७२=४१६.८६३ | ५५.१३३ |
| ४ | | तिसरा मजला | ४१०.५९१ + ६.२७२= ४१६.८६३ | ३७.३९६ |
| ५ | | चवथा मजला | ४१०.५९१.+ ६.२७२=४१६.८६३ | ५५.१३३ |
| एकुण | १४०५.८४ | | १६८५.८५३ | १४७.६६२ |

**अटी व शर्ती**

१) सदर बांधकामास मंजुरी हे आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन  एक वर्ष पर्यंत वैध राहील. त्या नंतर नियमानुसार विहित मुदतीत स्वत:ला अर्ज करून नुतनीकरण करूण घ्यावे लागेल.

२) बांधकाम सोबतचे मंजुर नकाशाप्रमाणे १६८५.८५३ चौ.मी. क्षेत्रातच असावे मंजुरी व्यतरिक्त बांधकाम करू नये. जादाचे बांधकाम करावयाचे झाल्यास सुधारीत मंजुरी घेवुनच करावे, अन्यथा परवानगी शिवाय अथवा परवानगी दिलेल्या पेक्षा जादा जागेत बांधकाम केल्यास महा.प्रादेशिक नगर रचना अधिनियम १९६६चे कलम ५२ व ५३ नुसार नगर परिषदेमार्फत कार्यवाही केली जाईल.

३) शेजाऱ्याचे जागेवर/रस्त्यावर/बोळ/गटार त्यावर अतिक्रमण होणार नाही, याची दक्षता घ्यावी,तसे बांधकाम पाहुन घ्यावे लागेल.

४) नकाशात दर्शविल्यप्रमाणे प्लॉटचे सभोवताल योग्य समास अंतर सोडुनच बांधकाम करावे. न.प. गल्ली/रस्त्याच्या दिशेने योग्य अंतर सोडुनच बांधकाम करावे.

५) बांधकामास शेजाऱ्याचे/शासकीय जागेवर दारे,खिडक्या,गटार वा इतर ओपनिंग ठेवु नये.आवार भिंतीची उंची दिड मिटर पेक्षा वाढवु नये.

६) आपल्या घराचे सांडपाण्याचे रितसर व्यवस्था आपण करावी व त्यापासुन कुणास त्रास होणार नाही याची दक्षता घ्यावी.

७) बांधकाम मटेरीयल पासुन शेजारी किंवा रहदारीस त्रास होणार नाही, किंवा रस्त्यावर मटेरीयल राहणार नाही याची काळजी घ्यावी, अन्यथा न.प.मार्फत कधीही मटेरीयल जप्त करण्यात येईल.

८)  शासनाचे वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार, दिलेल्या बांधकाम परवानगीमध्ये फेरबदल करण्याचे अधिकार नगर परिषदेकडे कायम ठेऊन सदर बांधकाम परवानगी देण्यात येत आहे.

९) आपणांकडुन सादर केलेल्या दस्तावेजावर परवानगी दिल्यानंतर कोणत्याही प्रकारची जमीनीबाबत आक्षेप आल्यास व वाद निर्माण झाल्यास आपले सुरू असलेले काम  बंद करावे लागेल आणि होणाऱ्या न्यायालयीन प्रकरण व इतर बाबींस न.प. वानाडोंगरी जबाबदार राहणार नाही, आपण वैयक्तिक जबाबदार राहणार.

१०) आपले घराच जोत्याचे बांधकाम मंजुर नकाशानुसार जमीनीपासुन वर असलेच पाहीजे.

११) नियमीत बांधकाम भुकंपरोधक करण्याचे दृष्टीने आपणांस बांधकाम चालु करण्यापुर्वी सक्षम स्थापत्य अभियंता कडुन भारतीय मानक संस्थेने प्रमाणीत केल्याप्रमाणे नकाशे व आराखडे सादर करणे बंधनकारक राहील,आणि तसेच आर.सी.सी. डिझाइनर कडुन कॉलम,बीम व स्लॅबचे आर.सी.सी. डिझाईन (भुकंपरोधक) करूनच सक्षम स्थापत्य अभियंताच्या देखरेखीखालील स्लॅब व इतर बांधकाम पुर्ण करावे लागेल..

१२) सदहु बांधकाम चालु असतांना आपण १०,११ नुसार कारवाई केल्याचे कळविल्यानंतर नगर पालिकेचे कनिष्ठ अभियंता हे जेव्हा जेव्हा कामास भेट देतील तेव्हा तेव्हा वरील प्रमाणे होत असलेल्या कामाची नोंदवही ठेवुन तशी नोंद घ्यावी, आणि त्यांनी दिलेल्या सुचनेनुसार पुढील बांधकाम करणे बंधनकारक राहील.

१३) वरील प्रमाणे अटी व शर्तीची पुर्तता न केल्यास भुकंपाचे वेळी व कच्चे बांधकाम केल्यामुळे किंवा नैसर्गिक आपत्तीमुळे व सदरील बांधकामामुळे दुर्घटना होवुन कोणतीही जिवीत किंवा वित्त हाणी झाल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपल्यावर राहील.

१४) वरील अटीचे उल्लंघन झाल्यास केलेले बांधकाम अवैध समजण्यात येईल, आणि आपणांस दिलेली बांधकाम परवानगी रद्द करण्यात येईल. या करीता सर्व अटीचे पालन करण्याच्या शर्तीवरच आपणास बांधकाम परवानगी देण्यात आहे.

१५) शासनाचे आदेशानुसार बांधकाम करतांना फ्लॉय ॲश विटांचा वापर करावा.

१६) छतावरील पावसाचे पाणी (Rain Water harvesting) साठवणुकीची स्वतंत्र व्यवस्था करावी.

१७) महाराष्ट्र शासन,उद्योग,उर्जा व कामगार विभाग शासन निर्णय क्रं. अपाऊ २००७/प्र.क्रं.५९०/उर्जा ७ दि. ११/९/२००७ अनुसार शासनाने सौर उर्जेवरील गरम पाण्याचे स्वतंत्र स्वखर्चाने न.प.क्षेत्रातील नागरीकांना बंधनकारक केले आहे.तरी त्याप्रमाणे आपण कार्यवाही करावी.

वरील अटीचे पालन न केल्याचे दिसुन आल्यास दिलेली बांधकाम परवानगी ही रद्द करण्यात येईल.

सहपत्र:— बांधकाम मंजुरी नकाशाची प्रत.

प्रशासक
नगर परिषद वानाडोंगरी

प्रतिलिपी :— १) कनिष्ठ अभियंता,न.प. वानाडोंगरी

उपरोक्त दिलेली परवानगी **मे. एल. जी. डेव्हलपर्स एण्ड बिल्डर्स, तर्फे धनराज गणपतराव बाबडे,** रा. नागपूर यांनी सादर केलेल्या नकाशा व आराखडयानुसार सक्षम अभियंताच्या देखरेखीखाली भारतीय मानक संस्थेने विहित केलेल्या तरतुदीनुसार चांगल्याप्रतीचे साहित्य वापरून बांधकाम करीत असल्याबाबत दर पंधरा दिवसाला भेट देवुन खात्री करून घ्यावी.भारतीय मानक संस्थेने विहित केलेल्या तरतुदीनुसार बांधकाम होत नसल्यास संबधिताचे बांधकाम बंद करून पुन: मानक संस्थेने दिलेल्या तरतुदीनुसार जबाबदारीने दुरूस्ती करून घ्यावी.

२) मुख्य कर संग्राहक,नगर परिषद वानाडोंगरी

नविन बांधकामाची प्रत्यक्ष तपासणी करून नियमानुसार नोंद घेवुन कर आकारणीची कार्यवाही करावी.

प्रशासक
नगर परिषद वानाडोंगरी